झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-॥, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/332/२०२४
दिनांक :14/03/२०२४

## "जाहीर नोटीस"
## (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

प्रस्तावना-

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **"उक्त अधिनियम"** असा करणेत आला आहे) चे कलम ३ अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करण्यात आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

(३) उक्त क्षेत्र तत्कालीन सक्षम प्राधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुरवणी, पृष्ठ क्र.३३१४, दि.०८/१२/१९८३ रोजी प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केले आहे

(४) उक्त क्षेत्र गलिच्छ वस्ती सुधारणा क्षेत्र म्हणुन अधिसूचीत केलेबाबत उप-आयुक्त, वि.क्र.२ कार्यालय, पुणे मनपा., यांचेकडील जा.क्र.उआ/२/३२, दि.१०/०४/२०१३ रोजीचे पत्रान्वये या प्राधिकरणास तसा अहवाल प्राप्त झाला आहे. तसेच, दि.१९/०४/२०१४ रोजी पार पडलेल्या मोजणी नकाशानुसार त्रिकोणमिती पध्दतीने येणारे क्षेत्र ७८९२.९३ चौ.मी. व मालमत्ता पत्रकानुसार ९२१८.२० चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्रापैकी कमीत कमी असलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

(५) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिक संस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटीस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील" असे नमूद केले आहे.

(६) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारित अधिनियम २०१७) चे कलम ३(क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरिता मुख्य

कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत, व तसे जाहीर करण्याबाबतची परिस्थिती असल्याची माझी खात्री झाली आहे.

सबब, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार सदर क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करण्यासंदर्भातील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश :-**

(१) अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्र झोपडपट्टी अधिनियम, १९७१ च्या कलम ३क नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन घोषित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(२) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मावण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी उक्त कलमाखाली "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून निर्धारीत करण्याबाबत अंतिम निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

(३) सदर प्रकरणी अधिनियमाच्या कलम ३क (१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन अंतिमत: घोषित करण्यासंदर्भात होणाऱ्या निर्णयाविरुध्द गृहनिर्माण विभागाअंतर्गत मा.उच्चस्तरीय तक्रार निवारण समिती, बांद्रे, मुंबई-३२ यांचेकडे अपील दाखल करता येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव** :- सि.स.नं.८०१ ते ८८१ (स.नं.१), मुंढवा, पुणे
**महानगरपालिका क्षेत्र** :- पुणे महानगरपालिका.

| गाव - मुंढवा, पुणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. | जमीनीमधील भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/ संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| सि.स.नं.८०१ ते ८८१ (स.नं.१) | सरकारी जमीन | ७८९२.९३ चौ.मी. | लागु रस्ता | लागु रस्ता | लागु रस्ता | लागु स.नं.२ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- / /२०२४

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा, पुणे-०१ यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.